N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** सांगोला **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0998 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/08/2022 00:51 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 23/08/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/08/2022
**Time From (वेळेपासून):** 13:59 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:21 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/08/2022 **Time (वेळ):** 00:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/08/2022 00:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वाढेगाव नाक्यावरील शिवअमत हट,पंचायत समिती सांगोला, वढेगाव नाक्यापासुन स्पंदन हस्प,सांगोला

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोष आनंदराव पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो पारे, ,सांगोला जि सोलापुर ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो पारे, ,सांगोला जि सोलापुर ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9809829086

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरेश सुधाकर फासे | | | 1. जवळा,सांगोला,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्रावण बाजीराव घाडगे | | | 1. अष्टविनायक जवळ ऑपर्टमेंट,सांगोला,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि. 24/08/2022 मी संतोष आनंदराव पाटील वय 36 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. मु. पो. पारे, ता. सांगोला जि. सोलापूर मो.क्रं. 9809829086 समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास असुन मी शेती व्यवसाय करुन आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. तसेच मी ग्रामपंचायत पारे येथील ग्रामपंचायत सदस्य असुन आमचे पारे या गावाकरीता 15 वित्त आयोग सन 2020 - 2021 या योजनेअंतर्गत गोरडवस्ती येथे पाईपलाईन करणे हे काम ग्रामपंचायत पारे ला मिळाले असुन सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर कामाच्या बिलावर सही करण्याकरीता तसेच पंचायत समिती सांगोला येथुन बिल मंजुर करुन आणण्याकरीता पारे येथील ग्रामसेवक फासे हे माझ्याकडे टक्केवारी स्वरुपात स्वत:करीता तसेच पंचायत समिती सांगोला येथील विस्तार अधिकारी घाडगे यांच्याकरीता 3,000/- रुपयांची मागणी करीत असल्यामुळे मी दिनांक 22/08/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, सोलापूर येथील पोलीस निरीक्षक श्री उमाकांत महाडिक यांचेशी संपर्क साधुन लाच मागणीची थोडक्यात तक्रार सांगुन ग्रामसेवक फासे यांनी लाचेच्या रक्कमेबाबत बोलणी करण्याकरीता मला दि. 23/08/2022 रोजी सांगोला येथे बोलाविले असल्याबाबत सांगीतले.त्यावरून पोनि महाडिक यांनी मला दि. 23/08/2022 रोजी 12:00 वा. चे सुमारास सांगोला येथील नगरपालिका स्माशानभुमीजवळ येवुन थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दि. 23/08/2022 रोजी 12.00 वा. चे सुमारास सांगोला येथील नगरपालिका स्माशानभुमीजवळ येवुन थांबलो. त्यानंतर काहीवेळातच पोलीस निरीक्षक श्री उमाकांत महाडिक हे त्यांचे स्टाफसह तेथे शासकीय वाहनाने आले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्या स्टाफला वाहनाच्या खाली उतरवुन मला वाहनामध्ये बोलावून घेतले व तेथे वाहनामध्ये उपलब्ध असलेले महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी सोलापूर येथील शासकीय पंच श्री जोतिराम आवारे व श्री शेखर होले यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता ती खालीलप्रमाणे असल्याचे सांगितले. मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास असुन मी शेती व्यवसाय करुन आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. तसेच मी सांगोला तालुक्यातील पारे या ग्रामपंचायत येथील ग्रामपंचायत सदस्य असुन सदस्य या नात्याने ग्रामपंचायत पारे येथील कामकाज करीत असतो. ग्रामपंचायत पारे अंतर्गत 15 व्या वित्त आयोग सन 2020 - 21 स्तरातुन मंजुर झालेली कामे ग्रामपंचायतीस मिळाल्यानंतर सदर कामाच्या कार्यरंभ आदेशानुसार ग्रामपंचायत यांच्याकडुन काम पुर्ण केले जाते. व त्याबाबतचे बील मिळणेकामी सर्व बीले व कागदपत्रे हे सरपंच व ग्रामसेवक यांच्या सहीने ग्रामसेवक पंचायत समिती सांगोला येथील विस्तार अधिकारी यांच्याकडे सादर करतात. मी एक ग्रामपंचायत सदस्य असल्याने सरपंच यंाच्या संमतीने पारे ग्रामपंचायत मार्फत करण्यात येणारे विकास कामांवर देखरेख ठेवणे, संपुर्ण नियोजन करणे व केलेल्या कामाचे

कागदपत्रांची पुर्तता करुन ग्रामपंचायत पारे येथे बिलांच्या तसेच कागदपत्रांच्या त्रुटींची पुर्तता करणे व वेळेत बिल मिळण्याच्या अनुषंगाने पाठपुरावा करणे हे माझे काम आहे. 15 व्या वित्त आयोग सन 2020 - 21 स्तरातुन पारे येथील गोरडवस्ती पाईपलाईनचे काम मंजुर झाले असुन सदरचे काम हे पारे ग्रामपंचायतीस मिळाले होते. त्याअनुषंगाने सदर कामाची सर्व जबाबदारी पार पाडण्याकरीता पारे येथील सरपंच यांनी लेखी आदेशान्वये माझी नियुक्ती केली आहे. त्यानुसार गोरडवस्ती पाईपलाईनच्या कामाचे संपुर्ण नियोजन हे मी केले असुन सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर सदर कामाचे बिल मंजुर होवुन मिळणेकरीता मी सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन त्यावर पारे येथील सरपंच श्रीमती चव्हाण यांची सही घेवुन ग्रामसेवक फासे यांची सही घेण्याकरीता दि. 22.08.2022 रोजी गेलो असता ग्रामसेवक फासे यांनी सदर कागदपत्रंावर सही करण्याकरीता त्यांच्याकरीता बिलाच्या 1 टक्के व बिल मंजुर होण्याकरीता पंचायत समिती सांगोला येथील विस्तार अधिकारी घाडगे यांच्यासाठी बिलाच्या 1 टक्के असे एकुण 3,000/- रुपये द्यावे लागतील असे सांगीतले. सदरवेळी मी त्यांना सद्या माझेकडे पैसे नसल्याबाबत तसेच सरपंच श्रीमती चव्हाण यांना विचारुन कळवितो असे सांगीतले. त्यावर ग्रामसेवक फासे यांनी मला दि. 23.08.2022 रोजी सांगोला पंचायत समिती येथे जाणार आहे. तुम्ही ठरवुन सांगोला येथे या असे सांगीतले. तरी 15 वित्त आयोगाच्या अंतर्गत केलेल्या कामाचे बिल मंजुर होण्याकरीता कोणालाही कोणतीही रक्कम अथवा टक्केवारी द्यावी लागत नाही तसेच ग्रामसेवक फासे हे त्यांच्यासाठी व विस्तार अधिकारी घाडगे यांच्यासाठी टक्केवारी स्वरुपात मागणी करीत असलेली रक्कम 3,000/- रुपये ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री असुन मला त्यांना कोणतीही लाच दयायची इच्छा नाही. माझा त्यांचेशी यापुर्वीचा कोणताही खाजगी पैशाचा देण्या घेण्याचा व्यवहार प्रलंबित नसुन ग्रामसेवक फासे व विस्तार अधिकारी घाडगे यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे अशी तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष मी माझी तक्रार लिहुन दिली. सदरची लेखी तक्रार पोनि महाडिक व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर मी पोनि महाडिक व पंचाना सांगीतले की काही वेळापुर्वी ग्रामसेवक फासे यांचा मला फोन आला होता व त्यांनी मला सांगोला येथील वाडेगांव नाक्यावरील हटेल शिवअमृत येथे बोलाविले आहे.त्यानंतर पोनि महाडिक यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी आम्हास व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये 08 जी.बी. चे नविन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी मी व माझ्या सोबत पंच नं 1 आवारे यांना सुचना दिल्या की, आम्ही दोघांनी सांगोला येथील वाडेगांव नाक्यावरील हटेल शिवअमृत येथे जावुन तेथे ग्राकमसेवक फासे यांची भेट घेवुन त्यांच्याशी पारे गावातील गोरडवस्ती येथील पाईपलाईनचे सुमारे 1,49,000/- रुपये किंमतीचे बील असुन त्यावर सही करुन मंजुरी करीता पंचायत समिती येथे सादर करणेबाबत चर्चा करावी. त्यावेळी ग्रामसेवक फासे यांनी स्वत:करीता तसेच पंचायत समिती सांगोला येथील विस्तार अधिकारी घाडगे यांच्याकरीता लाचेची मागणी केल्यास थोडावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, अश्या सविस्तर सुचना मला दिल्या व पंच नं.1 आवारे यंाना माझ्या सोबत हजर राहुन ग्रामसेवक फासे व माझ्यामध्ये होणारे संभाषण ऐकावे अशा सुचना दिल्या. त्यानंतर पोनि महाडिक यांनी व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्या गळ्यात शर्टचे आत बनियानच्या आतील बाजूस अडकवून मला व पंच नं.1 आवारे यांना सांगोला येथील वाडेगांव नाक्यावरील हटेल शिवअमृत येथे, माझ्याकडील हिरो होन्डा कंपनीची पशन प्लस वाहन क्रमांक एम.एच.03 एडी 4028 या दुचाकी वरुन 13.59 वा. पाठवले. त्याप्रमाणे मी, पंच नं 1 आवारे यांच्यासह सांगोला येथील वाडेगांव नाक्यावरील हटेल शिवअमृत येथे गेलो असता तेथे आजुन ग्रामसेवक फासे हे आले नव्हते म्हणुन मी माझा मोबाईल क्रं. 9809829086 वरुन त्यांचा मोबाईल क्रं. 7666864272 वर फोन करुन या की लवकर असे म्हणालो असता ग्रामसेवक फासे यांनी कोठे आहे असे विचारले त्यावर मी त्यांना शिवअमृत हटेल जवळ असल्याबाबत सांगीतले. त्यानंतर काहीवेळातच ग्रामसेवक फासे हे सदर ठिकाणी आले त्यानंतर मी, ग्रामसेवक फासे, व पंच आवारे असे हटेल शिवअमृत मध्ये जावुन बसलो. तेथे मी ग्रामसेवक फासे यांना गोरडवस्ती येथील पाईपलाईनचे कामाची माझ्या जवळची एम बी देवुन सही करुन पुढचे काम करुन द्या की, एक लाख एकोनपन्नासच बिलाय असे सांगीतले त्यावर ग्रामसेवक फोसे यांनी ती नव्ह पैसे असे म्हणुन माझ्याकडे पैश्याची मागणी केली त्यावर मी माझा मित्र शुभम यांच्याकडुन घेवुन देतो ते सही तेवढ करुन दया असे सांगीतले. त्यावर ग्रामसेवक फासे यांनी देतो की असे म्हणाले त्यावर मी ग्रामसेवक फासे यांनी मागीतलेल्या 3,000/- लाच रक्कमेध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न करुन दोन हजार रुपये घेणार नाही का असे विचारले असता त्यावर फासे यांनी ते एक टक्का घेतात असे सांगीतले. त्यावर मी तीन हजारच घेणार का असे विचारुन त्यांनी मागीतलेल्या लाच रक्कमेस संमती दिली व शुभमकडुन घेवुन देतो असे सांगीतले त्यानंतर ग्रामसेवक फासे यांच्यासोबत इतर चर्चा करुन शुभम कडुन घेवुन येतो असे म्हणुन तेथुन पंच आवारे यांच्यासह पोनि. महाडिक थांबले होते त्याठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकर्डर काढून पंच नं.1 आवारे व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर, पोनि महाडिक यांनी व पंचांनी व्हईस रेकर्डरमध्ये माझ्यात व ग्रामसेवक फासे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये फासे यांनी ग्रामपंचायत पारे येथील पाईपलाईनच्या कामाचे बिला वर सही करण्याकरीता बिलाचे 1 टक्का प्रमाणे 1500/- रुपये व  सदरचे बिल पंचायत समिती सांगोला येथुन मंजुर होण्याकरीता विस्तार अधिकारी घाडगे यांच्याकरीता 1 टक्का प्रमाणे 1500/- रुपये असे एकुण 3,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.  ग्रामसेवक फासे यांनी माझ्याकडे स्वत:करीता 1500/- रुपये व विस्तार अधिकारी घाडगे यांच्याकरीता 1500/- रुपये असे एकुण 3,000/- रुपयांची मागणी केली असल्याने सदरबाबत खात्री करण्याकरीता पोनि महाडिक यांनी पंचायत समिती सांगोला येथील विस्तार अधिकारी घाडगे यांची देखील पडताळणी कारण्याचे ठरविले. त्याअनुषंगाने ग्रामसेवक फासे यांना फोन करुन घाडगे साहेबांची भेट घालुन देण्याबाबत विनंती करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार पोनि महाडिक यांच्या सुचनेवरुन मी माझा मोबाईल क्रं. 9809829086 वरुन ग्रामसेवक फासे यांचा मोबाईल क्रं. 7666864272 वर फोन करुन स्पिरकर फोन ऑन करुन संभाषण केले त्यामध्ये मी कुठाय भाऊसाहेब असे विचारले असता ग्रामसेवक फासे यांनी ते पंचायत समिती येथे असल्याबाबत सांगीतले. त्यावर मी त्यांना कडलास नाक्याला येताय का असे विचारले असता नाय नाय पैशे राहु दया घाडगे साहेबच नायती ते बाहेर गेले आहेत असे सांगीतले त्यावर मी चालतय ठिक आहे असे म्हणुन फोन कट केला. सदरचे संभाषण पोनि महाडिक यांनी व्हईस रेकर्डर द्वारे रेकर्डिग करुन घेतले आहे. ग्रामसेवक फासे यांच्याकडुन विस्तार अधिकारी घाडगे हे कार्यालयात नसल्याबाबत समजल्याने माझ्या विनंतीवरुन पोनि महाडिक यांनी पडताळणी कारवाई तुर्त थांबवुन विस्तार अधिकारी घाडगे यांचेविरुध्द दि. 24/08/2022 रोजी पडताळणी कारवाई करण्याचे नियोजित केले. त्यानंतर सदर ठिकाणी पंचनामा करण्याकरीता सोय नसलेने पोनि महाडिक यांनी मला अन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कार्यालयाचे ठिकाणी येण्याच्या सुचना दिल्या. सदर ठिकाणी कार्यालयात ध्वनिमुद्रीत संभाषणाचा उतारा काढुन घेवुन सदरचे मेमरीकार्ड पुढील पडताळणी कारवाई मध्ये वापरण्याकरीता पुन्हा त्याचे कव्हर मध्ये घालुन त्यांचेकडे सुरक्षीत ठेवले. व त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा तसेच माझा जबाब नोंद करण्यात आला व मला, पंचाना तसेच सापळा पथकाला झाले कारवाईबाबत गोपनियता राखण्याच्या तसेच मला दि. 24/08/2022 रोजी 12:00 वा. सांगोला येथील नगरपालिका स्मशानभुमीजवळ येवुन थांबण्याच्या व दोन्ही पंचाना तसेच सापळा पथकास सकाळी 10:00 वा. अन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे येण्याच्या योग्य त्या सुचना देण्यात आल्या

नि महाडिक व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर मी पोनि महाडिक व पंचाना सांगीतले की काही वेळापुर्वी ग्रामसेवक फासे यांचा मला फोन आला होता व त्यांनी मला सांगोला येथील वाडेगांव

सदर ठिकाणी आले व पोनि महाडिक यांनी माझे गळयात अडकविलेला व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ग्रामसेवक फासे यांना रंगेहात पकडले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी फासे यांना लाच रक्कम कोठे आहे याबाबत विचारले असता फासे यांनी त्यांच्या हातात असलेली लाच रक्कम पोनि महाडिक यांचे समोर धरली त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन पंच नं. 02 होले यांच्या हातातुन लाचेची त्यांच्या ताब्यात घेवुन नमुद नोटांची यापुर्वी नमूद केलेल्या नोटांच्या नंबराशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी पोशि सन्नके यांना फोन द्वारे विस्तार अधिकारी घाडगे यांना ताब्यात घेण्यास सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी फासे यांना ताब्यात घेवुन शासकीय वाहनामध्ये घेवुन आले व सदर ठिकाणी कृत्रिम अंधार करुन लाचेच्या नोटा, फासे यांचे दोन्ही हातांची अ.वा. दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर, फासे याच्या उजव्या हाताच्या बोटांवर अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. सदरच्या नोटा पुराव्याकामी पोनि महाडिक यांनी ताब्यात घेतल्या. त्यानंतर ग्रामसेवक फासे यांना ताब्यात घेवुन आम्ही सर्वजन पंचायत समिती सांगोला येथे येवुन विस्तार अधिकारी घाडगे यांना ताब्यात घेतले त्यानंतर पोनि महाडिक यांनी दोन्ही पंच व सापळा पथकासमक्ष फासे व घाडगे यांना त्यांचे नाव गाव याबाबत विचारणा केली असता फासे यांनी त्यांचे नाव सुरेश सुधाकर फासे वय 45 वर्षे, पद- ग्रामसेवक पारे सध्या रा. मु. पो. जवळा ता. सांगोला जि. सोलापूर व घाडगे यांनी त्यांचे नांव श्रावण बाजीराव घाडगे, वय 56 वर्षे , पद – विस्तार अधिकारी, पंचायत समिती सांगोला रा. अष्टविनायक अपार्टमेंट जवळ, एखतपुर रोड, सांगोला जि. सोलापूर असे सांगितले. या दोघांना पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेत असल्याचे पोनि महाडिक यांनी मला व दोन्ही पंचांना सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजन पंचायत समिती शासकीय निवासस्थान येथे आलो व सदरबाबत सविस्तर पडताळणी व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही पंचायत समिती सांगोला, शासकीय निवासस्थान येथे दि.24.08.2022 रोजी पूर्ण करण्यात आली.

तरी आमचे सांगोला तालुक्यातील पारे या गावाकरीता 15 वित्त आयोग सन 2020 - 2021 या योजनेअंतर्गत गोरडवस्ती येथे पाईपलाईन करणे हे काम ग्रामपंचायत पारे ला मिळाले असुन सदर कामाची पुर्ण जबाबदारी सरपंच श्रीमती चव्हाण यांनी माझ्यावर सोपविली असल्याने सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर कामाचे बिल मंजुर होणेकरीता सदर कामाच्या बिलावर सही करण्याकरीता तसेच पंचायत समिती सांगोला येथुन बिल मंजुर करुन आणण्याकरीता पारे येथील ग्रामसेवक फासे यांनी

दि. 23/08/2022 रोजी 13:59 ते 14:12 वा. चे दरम्यान वाढेगाव नाक्यावरील शिवअमृत हॉटेल येथे माझ्याकडे टक्केवारी स्वरुपात स्वत:करीता तसेच पंचायत समिती सांगोला येथील विस्तार अधिकारी घाडगे यांच्याकरीता 3,000/- रुपयांची मागणी करुन त्यांच्याकडे आणुन देण्यास सांगीतले व यातील विस्तार अधिकारी घाडगे यांनी दि 24/08/2022 रोजीचे 15.03 ते 15.19 वा सुमारास पंचायत समिती सांगोला येथे ग्रामसेवक फासे यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेस संमती देवुन तडजोडी अंती 500/- रुपये कमी करुन उर्वरीत लाच रक्कम ग्रामसेवक फासे यांच्याकडे देण्यास सांगीतली. व सदरची लाच रक्कम 2500/-रु ही दि 24/08/2022 रोजीचे 17.16 ते 17.21 वा सुमारास ग्रामसेवक फासे यांनी वाडेगांव नाक्यापासुन स्पदंन हॉस्पिटलकडे जाणा-या रस्त्यावर स्विकारुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी सुरेश सुधाकर फासे पद- ग्रामसेवक पारे व श्रावण बाजीराव घाडगे, पद – विस्तार अधिकारी, पंचायत समिती सांगोला यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद .

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा जबाब दिला स.ता.म

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Anant Mahipatrao Kulkarni(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

Signature of Officer in charge, Police Station (पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): Anant Mahipatrao Kulkarni
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):